**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.**

**मा.स्थायी समिती**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - १९</u>**

**(सभावृत्तांत)**

दिनांक–२६/०७/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक २६/०७/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ऊंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
६) मा.कुटे निर्मला संजय
७) मा.कोमल दिपक मेवानी
८) मा.आशा धायगुडे-शेंडगे
९) मा.गोफणे अनुराधा देविदास
१०) मा.वैशाली जालिंदर काळभोर
११) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१२) मा.राजू मिसाळ
१३) मा.अमित राजेंद्र गावडे
१४) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर–आयुक्त, मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल,मा.गावडे-सहआयुक्त,मा.पाटील,मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे,मा.कडूसकर,मा.दुरगुडे,मा.आष्टीकर,मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोत-सहाय्यक आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम,मा.सवणे,मा.इंगळे,मा.तांबे,मा.चव्हाण,मा.घुबे,मा.थोरात,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे, मा.रत्नपारखी,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.घोडे,मा.कांबळे,मा.ओंभासे,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.मोरे, मा.पाटील-कार्यकारी अभियंता,मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.बहुरे,मा.दांगट-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक ३६) नवी सांगवी येथील मनपाच्या बॅडमिंटन हॉल मधील एक खोली नाममात्र शुल्काने देणेबाबत – मा.उत्तम केंदळे, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव....

विषय क्रमांक ३७) मा.महापौर सो. यांच्या वापराकरीता नवीन वाहन खरेदी करणेबाबत...

-----------

दिनांक १२/०७/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १७) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----------

**निर्णय–१) <u>पी.जी.पोर्टलवरील तक्रारीबाबत -</u>** पी.जी.पोर्टलवर महापालिकेचे नाव घेऊन तसेच मा.मुख्यलेखापाल यांचेविषयी तक्रारदाराने तक्रार दाखल केली होती. तक्रारदाराने केलेल्या तक्रारीनुसार गुन्हा केला नसेल किंवा तसे सिद्ध होत नसेलतर संबंधित तक्रारदारावर फौजदारी गुन्हा दाखल करावा. कारण यापुढे तक्रार करणारी व्यक्ती तक्रार करण्यापूर्वी विचार करेल. पुढील सभेपर्यंत कायदा विभागाने सर्व तांत्रिक बाबी तपासून घ्याव्यात. पिंपरी चिंचवड महापालिकेचे नाव घेऊन महापालिकेची बदनामी केली म्हणून संस्था या नात्याने त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करावी लागेल. यासंदर्भात महापालिकेला कडक पाऊले उचलावी लागतील.

**२) <u>ताडपत्रीसंदर्भात –</u>** जो अहवाल प्राप्त झाला आहे. प्रशासनाने त्याची प्रेसनोट करुन वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्धीस द्यावे.

**३) <u>जाहिरात फलकांबाबत –</u>**

**अ)** आकाशचिन्ह व परवाना विभाग आणि भूमि आणि जिंदगी विभाग हे दोन विभाग दूर्लक्षित विभाग आहेत. या विभागांतून मिळणारे उत्पन्न खूप कमी आहे. पुणे महानगरपालिकेने स्वतःचे जाहिरात धोरण तयार केले असून त्या धोरणाप्रमाणे ते कार्यवाही करीत आहेत. मुंबई महापालिका, नवी मुंबई महापालिका, पुणे महापालिका, नाशिक महापालिका या महापालिकांमध्ये जाहिरातीचा बोर्ड लागल्यानंतर त्यास महापालिकेची परवानगी आहे का नाही, जागामालकाची परवानगी आहे का नाही इ. बाबी तपासून फलक काढून नेणे, दंड मारणे अशी कारवाई केली जाते. आपल्या महापालिकेकडून असे काहीच प्रयत्न केल्याचे दिसत नाहीत.

**ब)** मा.अति.आयुक्त आणि मा.सहा.आयुक्त,आकाशचिन्ह व परवाना यांनी पुढील स्थायी समिति सभेपुढे पुढीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावीत –

**१.** शहरात १८०५ खाजगी जाहीरात फलक आहेत, त्यांचे जागा मालकांचे इमारत पूर्णत्वाचे दाखले,

**२.** संरचना अभियंत्याने काढलेल्या जाहीरात फलकाचे संकल्पचित्र,मान्यताप्राप्त स्ट्रक्चरल इंजिनिअरचे स्ट्रक्चरचे डिजाईन द्यावे.

**३.** पोलिस वाहतूक शाखेचे नाहरकत प्रमाणपत्राची मूळप्रत/सत्यप्रत - पोलिस वाहतूक शाखेचे नाहरकत प्रमाणपत्राची मूळप्रत/सत्यप्रत नसल्यास त्यांस नोटीस देण्यात यावी.

**४.** स्टॅबिलिटी प्रमाणपत्राची मूळ प्रत सादर करावी.

**५.** शंभर रुपये स्टॅम्प पेपरवर हमिपत्राची मूळ प्रत सादर करावी.

**क)** मा.मुख्य उद्यान अधिक्षक यांनी आजपर्यंत किती लोकांना जाहीरातीचे नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे,जागेचा मूळ मालक कोण आहे, इमारतीवर जाहिरात फलक असल्यास इमारत भोगवटा प्रमाणपत्राची सत्यप्रत, ही सर्व माहिती पुढील स्थायी समितीपुढे सादर करावी.

**ड)** रस्त्यावरील, रस्ता रुंदीकरणात जे काही फलक असतील त्यांचा महसूल हा महापालिकेकडे येणे अपेक्षित आहे. याकरिता अधिका-यांनी स्थळपाहणी करावी.

**इ)** सर्व जाहिरात फलक धारकांना नोटीस बजावण्यात यावी. आणि मा.अति.आयुक्त साहेब, आपण किती नोटीसींवर सही केली आहे याची माहिती दोन/तीन दिवसांमध्ये स्थायी समितीस सादर करावी.

**ई)** रितसर परवानगी घेणा-या मोबाईल कंपन्या महापालिकेकडे कोट्यवधी रुपये भरत आहेत. मात्र शहरात वेगवेगळ्या कंपन्यांच्या इंटरनेट कनेक्शन केबलने विनापरवाना लावल्याचे दिसून येते आहे. अशा लोकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी याबाबत निश्चित धोरण तयार करावे. याबाबत मा.अति.आयुक्त यांनी कडक शव्दांत प्रेसनोट काढावी की, जे-जे लोक डेटा केबल, टि.व्ही केबलच्या वायरी टाकत असतील, त्या त्यांनी स्वतः काढून टाकाव्यात, नाहीतर त्या महापालिकेकडून काढून टाकल्या जातील. अन्यथा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. लोकांना आवाहन करावे की, केबल केव्हा लागली हे पाहिले जाणार नाही आणि गेले दहा वर्षांपासूनचा दंड आकारण्यास सुरुवात करण्यात येईल.

**४) <u>ड्रेनेजबाबत –</u>** प्र.क्र.५ मध्ये ड्रेनेजची समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली आहे. नूरमोहल्ला गल्लीत गुडघ्याइतके पाणी तिथेच साचलेले असते. तीन दिवसांपूर्वी सांगूनही ते पाणी काढलेले नाही. त्या साचलेल्या पाण्यातूनच नागरीक, लहान मुले ये-जा करतात. सन्मा.सदस्यांनी स्वतः जाऊन क प्रभागातून गाडी घेऊन ते पाणी उपसून काढायचे काम केले आहे. सन्मा.सदस्या अनुराधा गोफणे यांनी मांडलेल्या तक्रारीवर ताबडतोब कार्यवाही व्हावी. प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करावी. प्रभागातील गाड्या का बंद आहेत हे तपासावे.

**५) <u>आपत्ती व्यवस्थापनबाबत</u> –** पोलिस खात्याचा १०० नंबर किंवा फायर ब्रिगेडसाठी १०३ नंबर असतो, त्याचप्रमाणे आपत्ती व्यवस्थापनाकरिता एक तीन अंकी नंबर ठरवून त्यास प्रसिद्धी द्यावी.

**६) <u>बिले प्रलंबित असलेबाबत</u> –** ठेकेदारांची रु.२७ कोटींची बिले आजही प्रलंबित आहेत आणि त्यासाठी तरतूद शून्य आहे. सर्व विभागप्रमुख आणि मा.शहर अभियंता यांना निर्देश देणेत येत आहेत, आपण पुढील स्थायी समितीपुढे खालीलप्रमाणे माहिती सादर करावी –

**अ)** निविदा काढली पण अजून निविदा अंतिम केली नाही अशा किती केसेस आहेत? सभागृहापुढे विषय आला नाही अशी किती प्रकरणे आहेत? अशा निविदा १५ दिवसांत अंतिम करुन स्थायी समितीपुढे सादर कराव्यात.

**ब)** निविदा काढली, फायनल केली पण वर्कऑर्डर दिली नाही अशा किती केसेस आहेत? पुढील १५ दिवसांत एकत्रित वर्कऑर्डर द्यावी. नाहीतर निविदा प्रक्रिया रद्द करावी.

**क)** निविदा काढली, कामाचा आदेश दिला आहे आणि सहा महिने झालेतरी काम सुरु झाले नाही, अशा किती केसेस आहेत? पुढील १५ दिवसांत आदेश दिल्यापासून जो कालावधी होतो, तोच गृहित धरणार आहोत. आदेश दिला पण प्रत्यक्षात काम सुरु केलेले नसेल, त्या सगळ्या ज्या वर्कऑर्डरचे काम आत्ता सुरु केले नाहीतर पुढील १५ दिवसांत त्या सगळ्या वर्कऑर्डर रद्द करायचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे आणावा.

**ड)** यापुढे ज्या निविदा करणार आहोत, त्याचे स्टेटस काय आहे? सर्व विभाग प्रमुख आणि मा.शहर अभियंता यांनी याचा स्टेटस रिपोर्ट द्यावा.

**इ)** डिपी डेव्हलपमेंटचा स्टेटस काय आहे? मा.शहर अभियंता यांनी याची माहिती द्यावी.

**७)** **<u>पी.एफ. बाबत</u>** – मार्च नंतर गठ्याने पी.एफ. भरला आहे, अशा किती संस्था आहेत, किती ठेकेदार आहेत, याची माहिती संबंधित अधिका-यांनी पुढील स्थायी समितीपुढे सादर करावी.

**८)** मे.मनिषा कन्स्ट्रक्शन यांच्याकडील पुणे-आळंदी रस्त्याबाबत ब-याच तक्रारी आहेत. मा.महापौर यांनी देखील त्यांच्या कामाबाबत तक्रार केली आहे. या तक्रारींत किती तथ्य आहे ते एकदा तपासावे. दिलेल्या मुदतीत काम पूर्ण झाले पाहिजे याची दक्षता घ्यावी. कामाच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड करु नये.

-----------

ठराव क्रमांक – ६८४ — विषय क्रमांक – १

दिनांक – २६/०७/२०१७ — विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.लक्ष्मण उंडे — अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२०४/२०१७ दि.१५/७/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाच्या नि.नो.क्र.2/78-2016-17 मधील अ.क्र.18 अन्वये प्र.क्र.6 मोशी येथे विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे.श्री नागेश्वर कंन्स्ट्रक्शन निविदा रक्कम रू.7,11,967/- (अक्षरी र.रु.सात लाख अकरा हजार नऊशे सदुसष्ट फक्त) पेक्षा 16.00% कमी या ठेकेदारास कामाचा आदेश देणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८५ — विषय क्रमांक – २

दिनांक – २६/०७/२०१७ — विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.उत्तम केंदळे — अनुमोदक–मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२०१/२०१७ दि.१४/७/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाच्या नि.नो.क्र. 7/5-2016-17 मधील अ.क्र.4 अन्वये प्रभाग क्र.35 भोसरी गावठाण मध्ये लांडगे सभागृहाची स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.साक्षी इंजिनिअर्स निविदा रक्कम रू.7,00,934/- (अक्षरी र.रु.सात लाख नऊशे चौतीस फक्त) पेक्षा 15.00% कमी या ठेकेदारास कामाचा आदेश देणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६८६ विषय क्रमांक – ३
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा. कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२००/२०१७ दि.१५/७/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाच्या नि.नो.क्र. 7/5-2016-17 मधील अ.क्र.3 अन्वये प्रभाग क्र.35 भोसरी गावठाण मध्ये राडारोडा उचलणेकामी मे.डी.पी.बाबर निविदा रक्कम रू.7,00,273/- (अक्षरी र.रु.सात लाख दोनशे त्र्याहत्तर फक्त) पेक्षा 22.50% कमी या ठेकेदारास कामाचा आदेश देणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६८७ विषय क्रमांक – ४
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/१९९/२०१७ दि.१५/७/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाच्या नि.नो.क्र.7/5-2016-17 मधील अ.क्र.1 अन्वये प्रभाग क्र.35 भोसरी गावठाण मध्ये रोड फर्निचरची कामे करणेकामी मे.एस.एस.एंटरप्रायजेस एस.एम.गुप्ता निविदा रक्कम रू.7,00,770/- (अक्षरी र.रु.सात लाख सातशे सत्तर फक्त) पेक्षा 18.99% कमी या ठेकेदारास कामाचा आदेश देणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६८८ विषय क्रमांक – ५
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२०३/२०१७ दि.१५/७/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाच्या नि.नो.क्र.7/5-2016-17 मधील अ.क्र.5 अन्वये प्र.क्र.30 चक्रपाणी वसाहत मध्ये बोर्ड बेंचेस व वाचनालय इ. स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.सांडभोर कंन्स्ट्रक्शन निविदा रक्कम रू.7,00,280/- (अक्षरी र.रु.सात लाख दोनशे ऐंशी फक्त) पेक्षा 23.25% कमी या ठेकेदारास कामाचा आदेश देणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८९ | विषय क्रमांक – ६

दिनांक – २६/०७/२०१७ | विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.राजू मिसाळ | अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/४१७/२०१७ दि.१५/०७/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा सार्वत्रिक निवडणूक 2017 आचारसंहिता कक्षाकरिता आवश्यक व्हीडीओ चित्रीकरण करणेकामी को.नो.सु.क्र.34/2016-17 अन्वये प्रसिध्द करुन दरपत्रक मागविणेत आले होते. प्राप्त नोटीशी मधील मे.आकाश फोटो ऍन्ड व्हिडीओ शुटींग, पुणे यांचे र.रु.1,780/- प्रती दिन प्रती व्हिडीओ कॅमेरा, कॅमेरामन व सिडीसह दरानुसार पुरवठा आदेश निर्गत केला आहे. त्यानुसार मे आकाश फोटो ऍन्ड व्हिडीओ शुटींग, पुणे यांनी र.रु.3,79,140/- (अक्षरी र.रु.तीन लाख एकोणऐंशी हजार एकशे चाळीस फक्त) चे झालेल्या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९० | विषय क्रमांक – ७

दिनांक – २६/०७/२०१७ | विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकिय)

सूचक – मा.कैलास बारणे | अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/कावि/४/१३१/२०१७ दि.०१/०७/२०१७

मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

थेरगाव व भोसरी रूग्णालयांमध्ये ऑल स्पेरेअर सॅनिटायझर मशीन करीता लागणा-या हायपो केमिकल टफची खरेदी करणेकामी मे.Innovative cleaning System यांचे दर एका नग करिता र.रू.२७,६९७/- इतके लघुत्तम दर प्राप्त झालेले आहेत. प्राप्त झालेले दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.७७ टक्केनी कमी आलेले आहेत. साहित्य खरेदीकामी पुरवठाधारकास पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. रूग्णालयांची आवश्यकता विचारात घेता करारनामा न करता आवश्यक ०७ टब खरेदी करणेकामी एकूण र.रू.१,९३,८७९/- (अक्षरी र.रू. एक लाख त्र्यान्नव हजार आठशे एकोणऐंशी फक्त) चे खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९१ | विषय क्रमांक – ८

दिनांक – २६/०७/२०१७ | विभाग – अ क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य

सूचक – मा.लक्ष्मण उंडे | अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.अ.क्षे.का./आ/२/कावि/४२४/२०१७ दि.७/७/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

अ क्षेत्रिय कार्यालया कडील निविदा नो.क्र.१-२/२०१७-१८ अन्वये पावसाळी स्ट्रॉम वॉटर चेंबर एकूण २४६२ खरडून साफसफाई करणे व निघणारा गाळ, कचरा, राडारोडा, झाडेझुडपे इ. वाहतुक करणेकामी मे.श्री जगन्नाथ महिला स्वयं. सेवा सह.संस्था मर्या. (निविदा र.रू.३,९२,४६५/- (अक्षरी र.रू. तीन लाख ब्यान्नव हजार चारशे पासष्ट फक्त) पेक्षा २२% कमी असे असून प्रस्तुतचे दर वाजवी असल्याने सदरचे निविदा दर स्विकृत करणेत आले आहेत ठेकेदार संस्थे सोबत कामाचा करारनामा करणेत आला असून कामाचे आदेश देणेत आलेले असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –६९२ विषय क्रमांक – ९

दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – अ क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक–मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.अ.क्षे.का./आ.-२/कावि/४५५/२०१७ दि.१२/७/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

जगदगुरू श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा २०१७-स्वच्छतागृहांची सुविधा पुरविणे करिता पोर्टेबल टॉयलेट उपलब्ध करणेकामी ई-निविदा नोटीस क्रमांक २/२०१७-१८ नुसार म.न.पा. वेबसाईटवर तसेच वृत्तपत्रातुन ई-निविदा नोटीस प्रसिद्ध करुन निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यानुसार निविदा सादर करणेचे अंतिम दिनांकास मे. @ पर्यावरण सोल्युशन्स, वारजे, पुणे ४१००५८ यांची एकमेव निविदा प्राप्त झाली असून कामाचे अंदाजपत्रकीय दर र.रु.८,५८,०००/- (अक्षरी र.रू. आठ लाख अठ्ठावन्न हजार फक्त) पेक्षा १२% दर कमी करुन सादर केला आहे. सदरचे दर स्विकृत करणेत आले असून या कामी र.रु.७,५५,०४०/- इतका खर्च अपेक्षित आहे. निविदा धारक यांना तातडीची बाब म्हणून काम सुरु करणेकामी कळविले असून तसा करारनामा केला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६९३ विषय क्रमांक – १०

दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा. कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/स्था/६९३/२०१७ दि.१५/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयामधील (१) प्रभाग क्र.९ शाहुनगर येथील रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे (२) प्रभाग क्र.९ मधील अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणेकामी मे.पेव्हटेक कंन्सलटंट यांची निविदा तयार करणे व निविदा पश्चात (Post Tender) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नेमणूक करणे व त्यांनी केलेल्या कामाची फी म्हणून मनपा प्रचलीत दराने प्रकल्प किंमतीच्या 2.35% सर्व करासह अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६९४ विषय क्रमांक – ११

दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – लेखा

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/६५४/२०१७ दि.१३/०७/२०१७

विषय- शालेय पोषण आहार सन २०१६-१७ योजनेअंतर्गत तरतुद वर्ग करणे व नविन लेखाशिर्ष निर्माण करणेबाबत...

विषय क्रमांक ११चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६९५ विषय क्रमांक – १२
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/८९/२०१७ दि.१७/०६/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे जानेवारी २०१७ मधील अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६९६ विषय क्रमांक – १३
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/९०/२०१७ दि.१७/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे फेब्रुवारी २०१७ मधील अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६९७ विषय क्रमांक – १४
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/९१/२०१७ दि.१७/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे मार्च २०१७ मधील अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६९८ विषय क्रमांक – १५
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/९२/२०१७ दि.१७/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे एप्रिल २०१७ मधील अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६९९ विषय क्रमांक – १६
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक–मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/९३/२०१७ दि.१७/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे मे २०१७ मधील अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७०० विषय क्रमांक – १७
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – नगरसचिव
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा. कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नस/२/कावि/२५५/२०१७ दि.१७/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

अखिल भारतीय महापौर परिषदेची सन २०१७-२०१८ ची वार्षिक वर्गणी र.रु.२०,०००/- (अक्षरी र.रु.वीस हजार फक्त) All India Council of Mayors या नावे धनादेशाद्वारे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७०१ विषय क्रमांक – १८
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/१२/कावि/१९१/१७ दि.१९/०७/२०१७
विषय - सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात नविन लेखाशिर्ष निर्माण करुन अंदाजपत्रक तरतूद रक्कम वर्गीकरण करणेस मान्यता देणेबाबत...

विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७०२ विषय क्रमांक – १९
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – माध्यमिक शिक्षण
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/२२३/१७ दि.१७/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१७ मध्ये झालेल्या परीक्षेमध्ये गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ कार्यक्रमासाठी १८ माध्यमिक विद्यालयातील ८०% पेक्षा जास्त गुण मिळालेल्या ७० व अंध व अपंग १२ असे एकुण ८२ विद्यार्थ्यांना प्रस्तावात नमूद प्रमाणे दयावयाचे प्रोत्साहन पर रक्कम ३३,७५,०००/- व कार्यक्रम आयोजनासाठी येणारा अपेक्षित खर्च र.रु.४०,०००/- (अक्षरी र.रु.चाळीस हजार फक्त) आगाऊ रक्कम मा.शिक्षणाधिकारी यांचे नावे अदा करणेस व सदरचा खर्च थेट पध्दतीने करारनामा न करता करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच

सन २०१७-१८ मध्ये माध्यमिक शिक्षण विभागाकडील गुणवंत विदयार्थी सत्कार समारंभ या लेखाशिर्षावरील तरतुद मधुन खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०३ विषय क्रमांक – २०

दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – प्रशासन

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/५/कावि/४३२/२०१७ दि.१९/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील गट "अ" ते गट "ड" मधील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी **Online** पध्दतीने भरती प्रक्रिया करणेसाठी मे. झिलटेक सर्व्हिसेस, कोथरुड पुणे यांना प्रस्तावात नमूद प्रमाणे महापालिका गट "अ" ते गट "ड" मधील रिक्त पदे ऑनलाईन पध्दतीने भरणेच्या कामाकरीता सेवाकरासह र.रु.2,24,228/- (अक्षरी र.रु.दोन लाख चोवीस हजार दोनशे अठठावीस फक्त) होत आहे. सदरच्या कामाचा करारनामा करुन घेवून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका YCMH, वैद्यकीय व इतर अत्यावश्यक सेवेतील बरीच पदे रिक्त असल्याने त्याचा रुग्ण सेवा व इतर अत्यावश्यक सेवेवर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे तात्काळ भरती करणे आवश्यक आहे. सदरची भरती करणेकामी सध्याची मे.झिल टेक सर्व्हिसेस, कोथरुड, पुणे यांचेकडून या वर्षापुरती थेट पद्धतीने Online अर्ज स्विकृती, उत्तरपत्रिका पुरविणे व OMR पद्धतीने तपासणे तसेच त्याअनुषंगाने इतर पद भरती विषयक कामकाज करुन घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०४ विषय क्रमांक – २१

दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकीय)

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/१४९/२०१७ दि.१९/०६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

वाय.सी.एम. रूग्णालयामध्ये कार्यान्वित असलेल्या मे.अमृता टेक्नॉलॉजीस यांचे मार्फत चालविणेत येणा-या हेल्थ कार्ड मॅनेंजमेंट सिस्टिमचे कामकाजास दि.१५.०७.१७ पासून पुढील ३ महिने कालावधीकरिता मुदतवाढ देणेकामी व त्याकरिता होणा-या र.रू.२९,९९,५१४.२५ (अक्षरी र.रू.एकोणतीस लाख नव्याण्णव हजार पाचशे चौदा आणि पैसे पंचवीस फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७०५ | विषय क्रमांक – २२

दिनांक – २६/०७/२०१७ | विभाग – नगरसचिव

सूचक – मा.लक्ष्मण उंडे | अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.नगरसचिव यांचे जावक क्र.नस/१/कावि/७५८/२०१७ दि.२०/०७/२०१७

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७०६ | विषय क्रमांक – २३

दिनांक – २६/०७/२०१७ | विभाग – माहिती व तंत्रज्ञान जेएनएनयुआरएम कक्ष

सूचक – मा.उत्तम केंदळे | अनुमोदक–मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जेएनएनयुआरएम/३/कावि/२८८/२०१७ दि.२०/७/१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मे.क्रिसील रिस्क एन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना JNNURM, AMRUT, Swaccha Bharat, AMRUT आणि Smart City अभियान अंतर्गत Project Monitoring & Reform Implementation Support (PMRIS) कामकाजाकरीता दि.२५/५/२०१६ रोजीचे करारनामा अटी शर्तीचे अधीन राहून दि.४ जुन २०१७ ते दि.३१ जुलै २०१७ या कालावधीकरीता दरमहा र.रू.९,१०,०००/- + सेवाकर/जी.एस.टी. या प्रमाणे एकूण र.रू.१७,३१,९३५/- + सेवाकर/जी.एस.टी.इतका खर्च अपेक्षित असून प्रस्तुत PMRIS चे कामकाजास दि.४ जुन २०१७ ते दि.३१ जुलै २०१७ पर्यंत मुदतवाढ देणेकामी व त्याकामी येणा-या एकूण खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७०७ | विषय क्रमांक – २४

दिनांक – २६/०७/२०१७ | विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.निर्मला कुटे | अनुमोदक – मा. कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/४२१/२०१७ दि.२०/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.१२/१/२०१६-१७ अन्वये दिघी येथे नविन ESR बांधणेकामी मे.एस.एस.साठे निविदा रक्कम रू.१,३८,५३,७६९/- (अक्षरी र.रू.एक कोटी अडोतीस लाख त्रेपन्न हजार सातशे एकोणसत्तर फक्त) पेक्षा २०.५०% जादा दराने (निविदा स्विकृती योग्य दरा पेक्षा १.७४% ने जादा) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.१,६६,९३,७९२/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०८ विषय क्रमांक – २५

दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/४१९/२०१७ दि.२०/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.९/६/२०१६-१७ अन्वये इ प्रभागातील मोशी, च-होली, दिघी टाक्यांवरून पाणीपुरवठा करणेसाठी मजुर पुरविणेकामी (2016-17) मे.शुभम उद्योगाची निविदा रक्कम रू.४१,८८,६६१/-(अक्षरी र.रू.एक्केचाळीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार सहाशे एकसष्ट फक्त) पेक्षा ६.४६% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.४१,१३,९७७/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०९ विषय क्रमांक – २६

दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/४२०/२०१७ दि.२०/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.९/८/२०१६-१७ अन्वये इ प्रभागातील भोसरी, इंद्रायणीनगर, पांजरपोळ टाक्यांवरून पाणीपुरवठा करणेसाठी मजुर पुरविणेकामी (2016-17) मे.शुभम उद्योग यांची निविदा रक्कम रू.२७,६६,०९७/- (अक्षरी र.रू.सत्तावीस लाख सहासष्ट हजार सत्त्यान्नव फक्त) पेक्षा ६.४६% कमी या दराने ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२७,१६,७७७/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१० विषय क्रमांक – २७

दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – माहिती तंत्रज्ञान

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.मा.तं.वि/९/कावि/३३३/२०१७ दि.२०/०७/२०१७

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटचे Dedicated Server वर Host करणेकामी लघुत्तम निविदाकार मे.टेक 9 सर्व्हीसेस, चिंचवड यांचे कडून नव्याने निविदा

कार्यवाही होईपर्यंत काम करुन घेतले असुन सदर वाढीव कामास येणारा खर्च रक्कम रुपये 3,52,083/- (अक्षरी र.रू.तीन लाख बावन्न हजार त्र्याऐंशी फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७११ विषय क्रमांक – २८

दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – पर्यावरण अभियंत्रिकी

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/१०/कावि/१६४/२०१७ दि.२०/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपा मार्फत प्रायोगिक तत्वावर सांगवी स्मशानभुमी मध्ये CNG गॅसदाहीनी बसविणेचे काम निविदा क्र.ENV/6/2012-13 अन्वये मे.जे ॲन्ड जे हॉटमॅक्स, हैद्राबाद यांचे मार्फत मार्च २०१५ मध्ये पूर्ण करणेत आले. तथापी निविदा काढणेच्या पूर्वीपासून मनपा मार्फत दिनांक १२/०९/२०१३ पासून वारंवार MNGL कडे CNG गॅसचा पुरवठा करणेसाठी मागणी करणेत आली आहे परंतू सांगवी भागात CNG गॅस पाईपचे काम निविदा कालावधीत MNGL कडून झाले नसल्याने कनेक्शन उपलब्ध होऊ शकले नाही. सद्यस्थितीत नुकतेच सांगवी भागात CNG गॅस पाईपालाईनचे काम पूर्ण झालेले असून त्यांनी गॅस कनेक्शन उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली असून त्यानुसार CNG गॅस पाईप कनेक्शन करणेत येत आहे. तथापी मार्च २०१५ रोजी गॅस शवदाहीनीचे काम पूर्ण होऊनही CNG गॅस पाईपलाईन उपलब्ध नसल्याने व त्यासाठी अजूनही कालावधी लागणार असल्याने तयार गॅसदाहीनी वापराविना पडून राहू नये म्हणून निविदा अटी शर्तीमध्ये पर्यायी व्यवस्था म्हणून गॅसबँकची तरतुद असल्याने सदरच्या LPGगॅसबँकचा वापर करुन सदरच्या गॅसदाहीनीच्या आवश्यक त्या चाचण्या घेऊन गॅसदाहीनीचा वापर चालू करणेस मा.आयुक्त यांचेकडील दिनांक २५/०५/२०१५ चे मान्य प्रस्तावानुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार गॅस दाहीनीचा वापर चालू करणेत आलेला आहे. परंतू सदरच्या निविदेमध्ये व यापूर्वीच्या मा.स्थायी समितीच्या ठरावामध्ये CNG गॅस दाहीनीचा उल्लेख असल्याने व गॅस दाहीनीचे काम पूर्ण झाले तरी CNG गॅस कनेक्शन उपलब्ध न झाल्याने पर्यायी व्यवस्था म्हणून तोपर्यंत LPG गॅसचा वापर करुन गॅसदाहीनी मा.आयुक्त यांचे मंजुरीने चालविणेत येत असून सद्यस्थितीत CNG गॅस कनेक्शन उपलब्ध झाल्याने ठेकेदारामार्फत कनेक्शन घेऊन गॅस दाहीनीचा वापर करणेत येणार असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>मा.सभापती यांचे आदेशानुसार विषय क्र.२८च्या अनुषंगाने झालेली चर्चा सभावृत्तांतामध्ये पुढीलप्रमाणे समाविष्ट करणेत येत आहे –</u>**

**मा.आशा धायगुडे-शेंडगे**–मा.सभापती, मा.आयुक्त साहेब आणि सन्मा.सभागृह, सांगवी स्मशानभुमीमध्ये CNG गॅसदाहीनी बसविण्याचे ठरले होते. CNG व LPG असा घोळ होता. परंतू आपल्या निविदा अटीमध्ये CNG असेच होते. मग आपण LPG वर का आलो. आत्तापर्यंत तो ठेकेदार LPG वापरत होता, मग त्या मनुष्यावर कोणती दंडात्मक कारवाई केली. त्यावेळचे आयुक्त, डॉ.श्रीकर परदेशी साहेब यांनी सुद्धा त्यांच्या फाईलमध्ये उल्लेख केला होता की, जोपर्यंत गॅस शवदाहीनी CNG ने चालत नाही,

तोपर्यंत ती कार्यान्वित करु नये. असा टिपणी आदेश असतानासुद्धा आपण ती स्मशानभूमी ठेकेदाराला चालवायला का दिली. काय कारणाने दिली होती. मला आत्ताच कळाले की, परदेशी साहेबांनी बोलल्यानंतर आयुक्त साहेबांनी ती शवदाहिनी चालवायची परमिशन दिली होती. किती महिन्यांसाठी परमिशन दिली होती. या विषयाची माहिती सांगावी.

**मा.कुलकर्णी (कार्य.अभियंता, पर्यावरण विभाग)** – मा.सभापती, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, जेव्हा टेंडर काढले होते त्यात उल्लेख होता की, CNG गॅसदाहिनी बसवणे. स्थायी समितीचा तसा ठराव होता. निविदेतही तसेच होते. निविदा काढण्यापूर्वीपासून आपण MNGL यांना फॉलोअप केला होता की,तिथे गॅस कनेक्शन लागणार आहे. मार्च २०१५ मध्ये ती गॅसदाहिनी बसवायचे काम पूर्ण झाले तरी MNGL ची पाईपलाईन किंवा CNG गॅस उपलब्ध झाला नाही. त्यावेळी परदेशी साहेबांनी यात जे लिहिले होते की, प्राण्यांसाठी किंवा पेटसाठी जे क्रिमेटर बसवले होते त्यावेळी तिथे जो प्रॉब्लेम झाला होता की, तिथे CNG उपलब्ध झाले नाही. त्यामुळे ती तशीच पडून होती. या उद्देशाने साहेबांनी त्यावेळी ते लिहिले होते. ही शवदाहिनी अशीच पडून राहू नये, त्यासाठी त्यावेळी परदेशी साहेबांनी असे लिहीले होते. त्यावर आम्ही लिहिले होते, या पर्टीक्युलर टेंडरमध्ये टर्मस् आणि कंडिशन्समध्ये असे आहे की, गॅसदाहिनीची प्रोव्हिजन आहे. या गॅसदाहिनीतले जे बर्नर्स आहेत, ते CNG / LPG किंवा कुठल्याही गॅसवर चालणारे असे इंपोर्टेड बर्नर्स आहेत. त्यात अशीच प्रोव्हिजन आहे. त्यात गॅसदाहिनी पूर्ण झालीतरी तिथे गॅस कनेक्शन उपलब्ध न झाल्यामुळे आपण प्रस्ताव ठेवला होती की, आहे त्या गॅसवर LPG वर गॅसदाहिनी चालवायची परमिशन द्यावी. त्यावेळच्या आयुक्तांनी त्यास परवानगी दिली. त्यांनी अशी अट घातली होती की, त्याची ट्रायल घ्या. आणि ट्रायल सक्सेसफूल झाल्यावर ती वापरायला हरकत नाही. ती पडून रहायची आवश्यकता नाही. आयुक्त साहेबांनी स्वतः फॉलोअप केला होता की, याचे कनेक्शन लवकर द्या. त्याचे कनेक्शन आत्ता उपलब्ध होते आहे.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे**–मा.सभापती, आयुक्त साहेबांनी परमिशन दिली. पण काहीतरी कारण ठरले असेल की वर्षभरात घ्यावे.

**मा.कुलकर्णी (कार्य.अभियंता, पर्यावरण विभाग)** – मा.सभापती, CNG पेक्षा LPG महाग पडतो.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे**–मा.सभापती, तो किती फायद्यात गेला किंवा तो महाग पडतो असा विषय अजिबात नाही.

**मा.कुलकर्णी (कार्य.अभियंता, पर्यावरण विभाग)** – मा.सभापती, CNG गॅसकनेक्शन मिळेपर्यंत वापरा असा उल्लेख केला होता. CNG गॅसकनेक्शन उपलब्ध होत नाही तोपर्यंत परमिशन दिली होती.

**मा.सभापती** – अटी शर्तीत बदल झाला. मा.आयुक्त साहेब आपण सांगा.

**मा.आयुक्त**–सन्मा.सभापती महोदया, सदर गॅसदाहिनी सुरु झाली होती पण गॅसच्या पूरवठ्याअभावाने ती चालू करता येत नव्हती. त्यावेळी तत्कालिन सन्मा.आयुक्तांमार्फत गॅसदाहिनी चालू करण्याचा विषय घेण्यात आला होता. सदर विषय अवलोकनार्थ स्थायी समिती समोर आणायचा राहिला होता म्हणून आत्ता हा विषय मा.स्थायी समितीसमोर आणला आहे.

**मा.सभापती** – त्याच्या बिलाचे पैसे कट करणार आहात का. मा.कुलकर्णी साहेब, आत्ता साहेबांनी जे स्पष्टीकरण दिले आहे, ते फाईलमध्ये ऑन रेकॉर्ड लागले पाहिजे. विषय क्रमांक २८ मंजूर करणेत येत आहे.

**निर्णय-** तत्कालिन मा.स्थायी समितीच्या ठरावाप्रमाणे CNG गॅसकनेक्शन उपलब्ध झाल्यावर बीलाची अदायगी करण्यात यावी, या अटीवर मंजूरी दिली होती. परंतु CNG गॅसकनेक्शन जोडण्यापूर्वीच बीलाची अदायगी करण्यात आली. मा.स्थायी समितीची मान्यता नसताना बीलाची अदायगी केल्याबाबत संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली याचा तपशील मा.स्थायी समितीपुढे सादर करावा.

-----------

ठराव क्रमांक – ७१२ विषय क्रमांक – २९
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/६५३/२०१७ दि.२१/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१३ विषय क्रमांक – ३०
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक–मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५/कावि/७०१/१७ दि.२१/०७/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

स्वच्छ भारत मिशन (नागरी) व स्वच्छ महाराष्ट्र मिशन (नागरी) जगजागृतीसाठी होर्डींग्ज ८*८ चे ३० नग व नोटीस बोर्ड २x१.५ चे १०० नग या आकाराचे होर्डींग्ज (छपाई करून लाकडी फ्रेमसह) तयार करून लावणेकामी प्राप्त कोटेशन मधील लघुत्तम पुरवठाधारक मे.दर्शन डिजीटल यांचेकडून कोटेशन मंजूर दराने र.रू.४४,६५०/- (अक्षरी र.रू.चौवेचाळीस हजार सहाशे पन्नास फक्त) काम करून घेणेत आले असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१४ विषय क्रमांक – ३१
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा. कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५/कावि/७००/१७ दि.२१/०७/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील स्वच्छ भारत मिशन (नागरी) व स्वच्छ महाराष्ट्र मिशन(नागरी) जनजागृती करणेकामी स्वच्छतागृहासाठी मागविलेले टि शर्ट (कॉटन) पुरविणेकामी ४ प्राप्त झालेल्या

कोटेशन पैकी मे.शिवसमर्थ एन्टरप्रायजेस यांचे र.रू.३२४/- प्रती नग या नुसार १०० टी शर्टसाठी र.रू.३२,४००/- हा सर्वात कमी दर असल्याने यांचेकडून कोटेशन मंजूर दराने र.रू.३२४००/- पर्यंत काम करून घेणेत आले असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७१५ | विषय क्रमांक – ३२

दिनांक – २६/०७/२०१७ | विभाग – उद्यान/वृक्षसंवर्धन

सूचक – मा.कैलास बारणे | अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/२५८/२०१७ दि.२०/७/२०१७

मा.अति.आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

मनपाचे उदयान विभागाकडील निविदा नोटीस क्र.1/2017-18 मधील सन 2017-18 या वर्षामध्ये मनपाचे वृक्षसंवर्धन विभागासाठी मोठी रोपे खरेदी करणेकामी मे.न्यू गार्डन गुरूस फार्म ॲन्ड नर्सरी निविदा रक्कम रूपये 19,50,000/- (अक्षरी र.रू.एकोणीस लाख पन्नास हजार फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-6.10 टक्के ने कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून सदर कामाचा आदेश निर्गत करणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. तसेच मनपाचे उद्यान/वृक्षसंवर्धन विभागाची नि.नो.क्र.१/२०१७-१८ नुसार ३००० वृक्षारोपणाची मोठी रोपे खरेदी करणेस मान्यता देणेत आली आहे. तथापि, चालू वर्षाच्या वृक्षारोपणासाठी या व्यतिरिक्त आवश्यक असणारी रोपे निविदा नो.क्र.१/२०१७-१८ चे मंजूर दरानुसार खरेदी करणेस व त्याकामी येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७१६ | विषय क्रमांक – ३३

दिनांक – २६/०७/२०१७ | विभाग – माहिती व जनसंपर्क

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे | अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/४/कावि/५६/२०१७ दि.२१/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दर वर्षी प्रमाणे, निगडी येथे साहित्य रत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव दि.१/८/२०१७ ते ५/८/२०१७ या कालावधीत आयोजित करणेत आला आहे. या अतंर्गत आयोजित कार्यक्रमामधील व्याख्याते व कलाकारांचे मानधन, बक्षिसे, फ्लेक्स बॅनर, स्मृतीचिन्हे, चहापान नाष्टा व भोजन व्यवस्था इ. करीता थेट पद्धतीने अंदाजे र.रू.१६,४०,५००/- (अक्षरी र.रु.सोळा लाख चाळीस हजार पाचशे फक्त) इतका खर्च अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१७ विषय क्रमांक – ३४

दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/१/कावि/५३८/२०१७ दि.२१/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.**ENV/**०१/२०१६-१७ मधील पिंपरी चिंचवड शहरातुन गोळा होणा-या हॉटेल वेस्ट पासुन पी.पी.पी. तत्वावरील बायोगॅस प्रकल्प उभारणे या कामासाठी २० वर्षे कालावधीकरिता मे.नोबल एक्सचेंज एन्व्हायरमेंट सोल्युशन्स प्रा.लि. यांनी सुधारित दरपृथ्थ:करणाद्वारे सर्व हॉटेलमधून ओला कचरा गोळा करणे, त्याचे Segregation करुन Shredding करणे व त्याची पेस्ट बंद टँकरव्दारे प्लॅन्टपर्यंत वाहतुक करुन त्याचे शास्त्रोक्त पध्दतीने बायोगॅस तयार करणे या एकत्रित कामासाठी दिलेला प्रति मे. टन र.रु.११२५/- निविदा अटी-शर्ती मधील ३.६.६ या कलमानुसार प्रत्येक वर्षी ५% वाढ या दराने काम करुन घेणेस तसेच निविदा अटी व शर्तीनुसार त्यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१८ विषय क्रमांक – ३५

दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – अ क्षेत्रिय कार्यालय पाणीपुरवठा

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अक्षेका/पापु/८/कावि/१८/२०१७ दि.२१/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या सुधारित अंदाजपत्रकात सदर कामास र.रु.४५,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंचेचाळीस लाख फक्त ) ला सुधारित प्रशासकिय मान्यता घेणेत आलेली आहे. त्यामुळे सदर निविदा क्रमांक १८/२९-२०१४-१५ चे काम सुधारित करावे लागणार आहे. निविदा क्रमांक १८/२९-२०१४-१५ च्या एकुण सुधारित खर्च र.रु.३१,८९,२८५/- (वाढीव खर्च र.रु.१०,६३,०९५/- ला मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे ‘अ’ क्षेत्रिय कार्यालय पाणीपुरवठा विभागाकडील निविदा क्र.१८/२९/२०१४-१५ च्या एकुण सुधारित खर्च रक्कम रुपये ३१,८९,२८५/- (वाढीव खर्च र.रु.१०,६३,०९५/-) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>**

ठराव क्रमांक –७१९ विषय क्रमांक – ३६
दिनांक – २६/०७/२०१७
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.उत्तम केंदळे, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव....

ॲक्टीव्ह व्हीजन स्कूल ऑफ स्पेशल चाईल्ड, सांगवी, पुणे २७ ही संस्था मा.धर्मादाय आयुक्त यांचेकडील नोंदणीकृत संस्था असुन सदर संस्था गेल्या दोन वर्षापासून मतिमंद मुलांना मानसिक दृष्ट्या स्थिर करणे करिता वेगवेगळे उपक्रम राबवित आहे. यासाठी त्यांना जागेची आवश्यकता असल्याने नवी सांगवी येथील मनपाच्या बॅडमिंटन हॉल मधील एक खोली दरमहा रु.१०००/- या नाममात्र शुल्कावर ११ महिने कालावधीसाठी देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७२० विषय क्रमांक – ३७
दिनांक – २६/०७/२०१७ विभाग – वाहन दुरुस्ती कार्यशाळा
सूचक – मा.उत्तम कैंदळे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.काशा/३/कावि/५४०/२०१७ दि.२६/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.महापौर यांच्या वापरात असलेले वाहन जुने झाले असलेने त्यांच्या वापराकरीता M/S.TOYOTO KIRLOSKAR MOTOR PVT LTD या कंपनीचे INNOVA CRYSTA या प्रकाराचे नविन वाहन गव्हरमेंन्ट ई मार्केट दराने (GeM) निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पद्धतीने खरेदी करणेकामी येणारे र.रु.१२,३९,०८३/- (अक्षरी रक्कम रुपये बारा लाख एकोणचाळीस हजार त्र्याऐंशी फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर वाहनास M/S.TOYOTO KIRLOSKAR MOTOR PVT LTD या उत्पादित कंपनीचे अधिकृत विक्रेते/दुरुस्तीधारक मे.शरयु टोयाटो/वाय.यम.मोटर्स भोसरी यांचेकडून जादा सुविधा बसविणेकामी निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पद्धतीने बसवुन घेणेकामी येणारे र.रु.२,०६,६०६/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख सहा हजार सहाशे सहा फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/५८/२०१७
दिनांक - ०८/०८/२०१७

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.